दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | मंगळवार 24 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 276 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# अवकाळी पाऊस, गारपिटीने परळी मतदारसंघात पिकांचे नुकसान

## आ. धनंजय मुंडेंच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना







■ परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)

कालपासून वातावरणात अचानक झालेल्या बदलानंतर परळी मतदारसंघातील अंबाजोगाई तालुक्यासह परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये अवकाळी पाऊस, वादळासह गारपीट झाल्याने उभ्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना परळी मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना दूरध्वनी द्वारे केले आहेत. रविवारी रात्रीपासून परळी मतदारसंघातील अंबाजोगाई व परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व बऱ्याच गावांमध्ये गारपीट झाली असून, त्यामुळे गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला, फळपिके यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी तत्काळ पंचनामे करून नुकसानीचे अहवाल शासनास पाठवण्याचा सूचना जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

या पूर्वी देखील खरीप हंगामात विशेष करून हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात परळी मतदारसंघात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून पंचनामे व अन्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला होता. त्याच पार्श्वभूमीवर गारपीट व वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची देखील भरपाई शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेतला आहे.

# संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सुवर्णरत्न पुरस्कार जाहीर

## अशोक केदार, अविनाश मुडेगावकर, रंजना जाधव आणि दत्ता बनसोडे पुरस्कारांचे मानकरी

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी

येथील संकल्प विद्या प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या सुवर्णरत्न पुरस्काराचे वितरण यावर्षी शनिवार, दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात येणार आहे. यावर्षी हे पुरस्कार अशोक केदार (सामाजिक), अविनाश मुडेगावकर (पत्रकारिता), रंजना जाधव - राठोड (शैक्षणिक), दत्ता बनसोडे (कला) यांना जाहिर झाले आहेत. शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी पुरस्कार वितरण सोहळ्यास व सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे कार्यवाहक प्रा.कैलास चोले यांनी केले आहे.




येथील संकल्प विद्या प्रतिष्ठान यांच्या वतीने विविध क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना दरवर्षी सुवर्णरत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. यावर्षी शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. सोबतच संकल्प विद्या मंदिर शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष, आयुष्यमान भारत मिशन समिती, महाराष्ट्र शासन) हे असून त्यांच्या हस्ते सदरील पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. तर संकल्प विद्या मंदिर शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी उदघाटक म्हणून श्रीमती अश्विनी सोनवणे -जिरंगे (अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई.) उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गंभीरे (नगरसेवक, न.प.अंबाजोगाई) तर प्रमुख अतिथी म्हणून मधुकर सुवर्णकार (गटशिक्षणाधिकारी, पं.स.अंबाजोगाई), दिनेश भराडिया (उपनगराध्यक्ष, न.प.अंबाजोगाई.), विशाल जाजू (संस्थापक अध्यक्ष, राजा बन्सीलालजी जाजू नागरी सहकारी पतसंस्था), डॉ.संदीप मोरे (बालरोग तज्ज्ञ, मोरया हॉस्पिटल), बंडू खांडेकर (अध्यक्ष, देवदूत प्रतिष्ठान), दगडू लोमटे (प्रमुख, सुवर्णरत्न पुरस्कार निवड समिती.) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी अशोक केदार, अविनाश मुडेगावकर, रंजना जाधव - राठोड व दत्ता बनसोडे या मान्यवरांना त्यांनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सुवर्णरत्न पुरस्कार - २०२६ देवून सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्कार निवड समितीचे प्रमुख दगडू लोमटे यांनी या पुरस्कारांच्या शिफारशी केल्या आहेत. तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यास व सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा. कैलास भागवत चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखाताई बडे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती कुलकर्णी, श्रीमती बुरांडे, श्रीमती घाडगे, श्रीमती जे.पी. शिंदे व संकल्प परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# सर्वांच्या अथक परिश्रमामुळे आष्टीतील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन यशस्वी झाले : चेअरमन राजेंद्र धोंडे

## पाच दिवसात आडीच लाख शेतकरी,नागरिक,विद्यार्थ्यांनी कृषी प्रदर्शनाचा घेतला लाभ

■ आष्टी (प्रतिनिधी)

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाने राज्यभरातील शेतकऱ्यांना एकत्र आणले. उद्घाटनानंतर विविध तांत्रिक सत्रे,मार्गदर्शन कार्यशाळा,कृषी तज्ञांचे व्याख्यान,सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रदर्शनाची शोभा वाढवली.शेतकऱ्याचे नेते माजी आ.भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतून छत्रपती शाहू, फुले,आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी,प्रशासन अधिकारी,प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमामुळे हे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन यशस्वी झाले आहे असे प्रतिपादन महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र धोंडे यांनी केले.

आष्टी येथे दि.१९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा आज समारोप करण्यात आला.पाच दिवस चाललेल्या या भव्य कृषी प्रदर्शनाने केवळ आष्टी तालुक्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी, उद्योजक,महिला बचत गट, कृषी तज्ज्ञ,विद्यार्थी व नागरिकांना एकत्र आणले. संयोजकांच्या माहितीनुसार, पाच दिवसांत २ लाख ५० हजारांहून अधिक शेतकरी, नागरिक,विद्यार्थ्यांनी कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतला. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते अभय धोंडे होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.स्वामीनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून व राज्य गीताने कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीराम आरसूळ यांनी केले. संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा. शिवदास विधाते यांनी प्रदर्शनाच्या नियोजनाची, विविध तांत्रिक आणि स्टॉल व्यवस्थापनाची माहिती दिली. मान्यवरांची उल्लेखनीय उपस्थिती या समारोप प्रसंगी महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र धोंडे,आरपीआयचे आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे,पंचायत समिती पाटोदा माजी सभापती अनिल जायभाय, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीशआबा शिंदे, माजी सरपंच संतोषभैय्या चव्हाण,संभाजी जगताप,हरिभाऊ जंजिरे,कुंडलिक आस्वर,व्यवस्थापन अजय वाबळे , युवराज खटके, जिजाऊ मसाले उद्योगाचे प्रमुख बाबू गर्जे, संस्थेचे प्रशासनन अधिकारी डॉ.डी.बी.राऊत, प्रा.शिवदास विधाते,प्रा.सागर वाघुले, प्रा. संदीप नन्नवरे,इंजि.पी.बी. बोडखे,नवीन कासवा,अमोल भंडारी,गौतम आजबे,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीराम आरसूळ,सर्व प्राध्यापक,कर्मचारीवृंद, विद्यार्थी, पत्रकार बांधव व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सतीशआबा शिंदे म्हणाले की, मोठ्या शहरांतील कृषी प्रदर्शनांना तिकीट घेऊन प्रवेश करावा लागतो. मात्र धोंडेसाहेबांच्या संकल्पनेतून आष्टीत शेतकऱ्यांसाठी विनामूल्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले,ही कौतुकाची बाब आहे.शेतकऱ्यांना लागणारी आधुनिक कृषी अवजारे,कीड व्यवस्थापन,बीज प्रक्रिया,आंतरमशागत तंत्रज्ञान,सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे तसेच अत्याधुनिक कॅमेऱ्यांद्वारे शेत निरीक्षण यांची माहिती स्टॉलच्या माध्यमातून देण्यात आली. महिलांच्या बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पुढील वर्षी आणखी व्यापक नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी आपल्या भाषणात शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्याचा गौरव करत आष्टी मतदारसंघ कोरडवाहू असूनही शिक्षण व कृषी क्षेत्रात नवे पर्व सुरू झाल्याचे सांगितले.



# जलालपूर येथील केशव साबळे यांना धमकी

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :



जलालपूर येथील केशव साबळे यांना शिवीगाळ व धमकी दिल्याच्या प्रकरणी परळी येथील संभाजीनगर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची (N.C.R.) नोंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. २५ जानेवारी २०२६ रोजी घडलेल्या घटनेबाबत एनसीआर क्रमांक 0013/2026 अंतर्गत नोंद करण्यात आली असून प्रकरणाची प्राथमिक नोंद पोलिसांनी केली आहे.

दाखल माहितीनुसार, २५ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १५.४६ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. त्यानंतर रात्री १९.५३ वाजता संबंधित बाबींची परळी शहर पोलिस ठाण्यात माहिती देण्यात आली असून . तक्रारीत केशव साबळे यांना आपल्याला फोनद्वारे वारंवार संपर्क साधत शिवीगाळ करणे, धमकी देणे व मानसिक त्रास देण्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासन पुढील तपास करत आहेत.

# श्रीसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त परळीत उत्साहात कार्यक्रम

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

"श्री संत गाडगेबाबा यांनी आयुष्यभर स्वच्छतेचा संदेश दिला.श्री संत गाडगेबाबा आपल्यासाठी दीपस्तंभ आहेत. त्यांच्याच विचारांचा वारसा पुढे चालवत, परळी शहरात 'स्वच्छ परळी, सुंदर परळी' हे सिद्धेश नेण्याचा आपला निर्धार आहे. नागरिकांनीही स्वच्छतेमध्ये सहभागी होऊन तो लोकसहभागातून एक यशस्वी निर्धार करावा, असे प्रतिपादन परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

श्रीसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त श्री संत गाडगेबाबा नगर (पूर्वीची चुकार गल्ली) येथे आयोजित कार्यक्रमात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.यावेळी बोलताना सौ. धर्माधिकारी म्हणाल्या की, गाडगेबाबांच्या नावाने या भागात उभ्या राहणाऱ्या सभागृहासाठी नगर परिषदेच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. या कार्यासाठी नागरिकांनीही प्रशासनाला साथ देऊन आपले परिसर स्वच्छ ठेवावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या या घोषणेचे उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून परळी तहसीलचे पुरवठा अधिकारी बालाजी कचरे, माजी नगरसेवक अनिल आष्टेकर, सामाजिक कार्यकर्ते विलास ताटे, हनुमान व्यायाम शाळेचे अध्यक्ष वैजनाथ ईटके, ॲड. अर्जुन सोळंके, आणि सुशील हरंगुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शंकर ताटे, लक्ष्मण ताटे, अमर ताटे, सोमनाथ ताटे, अतुल ताटे, दत्ता ताटे, डिगांबर ताटे, महेश ताटे, राम ताटे, अजय शिंदे, अशोक जाधव, सचिन कोकरे, स्वप्निल जाधव, रूपेश वाघमारे, महादेव पवार, विजय जाधव, कृष्णा सूर्यवंशी, महादेव ताटे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तरेश्वर सोळंके यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शंकर ताटे यांनी मानले. या सोहळ्याला परिसरातील महिला, पुरुष व बालकांची मोठी उपस्थिती होती.



## संपादकीय

# 'सरदारां'ची खरेदी

गेल्या काही वर्षांपासून भारतात खेळल्या जाणाऱ्या इंडियन प्रीमिअर लीग अर्थात आयपीएल स्पर्धेने क्रिकेट विश्वात एक आगळेवेगळे स्थान निर्माण केले. प्रीमिअर लीग केवळ भारतातच खेळली जाते, अशातला भाग नाही. पाकिस्तान, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिजसह अन्य देशांतही प्रीमिअर लीग खेळवली जात आहे. पण, भारत आणि क्रिकेटचे एक आगळेवेगळे नाते असल्याने अन्य देशांच्या तुलनेत भारतातील आयपीएल स्पर्धेला एक वलय आहे. अर्थात हे वलय खेळामुळे कमी, पण त्या स्पर्धेत खेळणाऱ्या खेळाडूंना मिळणाऱ्या पैशांमुळे जास्त प्राप्त झाले आहे, हे सत्य आहे. आयपीएलची सुरुवात २००८ मध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय)ने केली, जी एक व्यावसायिक टी-२० क्रिकेट लीग आहे, ज्यात जगभरातील खेळाडू खेळतात. राजस्थान रॉयल्सने पहिले विजेतेपद जिंकले आणि आता मुंबई इंडियन्स व चेन्नई सुपर किंग्स हे प्रत्येकी पाच वेळा विजेते ठरले आहेत. संघात बदल, संघांची वाढ आणि 'दिल्ली डेअरडेव्हिल्स'चे 'दिल्ली कॅपिटल्स'मध्ये नामकरण यांसारख्या अनेक घडामोडी घडल्या आहेत, ज्यामुळे ही जगातील सर्वात लोकप्रिय लीग बनली आहे. २००७ मध्ये बीसीसीआयने ललित मोदी यांच्या नेतृत्वाखाली या लीगची स्थापना केली. २००८ साली झालेल्या पहिल्या स्पर्धेत ८ संघांनी भाग घेतला. राजस्थान रॉयल्सने शेन वॉर्नच्या नेतृत्वाखाली पहिले विजेतेपद जिंकले.

१८ एप्रिल २००८ रोजी कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु यांच्यात स्पर्धेतील पहिला सामना झाला. २०११ मध्ये पुणे वॉरियर्स इंडिया आणि कोची टस्कर्स केरळ हे संघ जोडले गेले. डेक्कन चार्जर्स (२०१२ मध्ये बंद) आणि कोची टस्कर्स केरळ (२०११ नंतर) या संघांची जागा अनुक्रमे सनरायझर्स हैदराबाद (२०१३) आणि इतर संघांनी घेतली. २०१३च्या स्पॉट फिक्सिंग प्रकरणामुळे चेन्नई सुपर किंग्स आणि राजस्थान रॉयल्स २ वर्षांसाठी निलंबित (२०१६-२०१७) झाले, त्यामुळे रायझिंग पुणे सुपरजायंट्स आणि गुजरात लायन्स हे तात्पुरते संघ आले. दिल्ली डेअरडेव्हिल्सचे नाव २०१९ मध्ये 'दिल्ली कॅपिटल्स' आणि किंग्स इलेव्हन पंजाबचे नाव २०२१ मध्ये 'पंजाब किंग्स' असे बदलले. २०२२ मध्ये गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या दोन नवीन संघांचा समावेश झाल्याने ही १० संघांची स्पर्धा बनली. ही स्पर्धा कोलकाता नाईट रायडर्सने ३ वेळा, डेक्कन चार्जर्स, सनरायझर्स हैदराबाद, गुजरात टायटन्स, आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु (२०२५ मध्ये) यांनी प्रत्येकी एकदा विजेतेपद पटकावले आहे. या आयपीएलच्या २०२६च्या स्पर्धेसाठीचा लिलाव मंगळवारी पार पडला. या लिलावात केवळ आंतरराष्ट्रीय तारेच नाही, तर अनकॅप्ड भारतीय खेळाडूंनीही सर्वांचे लक्ष वेधले. कोलकाता नाईट रायडर्सने ऑस्ट्रेलियन अष्टपैलू कॅमेरून ग्रीनला २५ कोटी रुपयांना खरेदी केले. तो सर्वात महागडा विदेशी खेळाडू ठरला आहे. आयपीएलमधील संघमालक खेळाडूंवर कोट्यवधी रुपयांची बोली लावतात. अर्थात ही बोली खेळाडूंच्या खेळावर अवलंबून असते. ही बोली दहा लाखांपासून २५ कोटींपर्यंतही गेल्याचे या आयपीएल लिलावात पाहावयास मिळाले. या स्पर्धेतून भारतालाही चांगले क्रिकेटपटू मिळाले आहे. या स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंचाही भारताला परिचय झाला. त्या खेळाडूंना वनडे, टी-२० तसेच रणजी स्पर्धांचीही दालने उपलब्ध झाली. कोलकाता नाईट रायडर्सने मुस्तफिजुर रहमान ९ कोटी, तेजस्वी सिंह दहिया ३ कोटी, रचिन रवींद्र २ कोटी, आकाशदीप १ कोटींची बोली लावली. चेन्नई सुपर किंग्जने प्रशांत वीर १४ कोटी, कार्तिक शर्मा १४ कोटी, मॅट हेन्री २ कोटी, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु या संघाने व्यंकटेश अय्यर ७ कोटी, मंगेश यादव ५ कोटी, जेकब डफी २ कोटी, मुंबई इंडियन्स संघाने क्विंटन डी कॉक १ कोटी, दिल्ली कॅपिटल्स संघाने आकिब नबी डार ८ कोटी, पथुम निसांका ४ कोटी, डेव्हिड मिलर २ कोटी, बेन डकेट २ कोटी तर लुंगी एनगिडी २ कोटी अशी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक झाली. अन्य कोट्यवधी रुपयांच्या लिलावात सनरायझर्स हैदराबादच्या लियाम लिविंगस्टोन १३ कोटी, जॅक एडवर्ड्स ३ कोटी, लखनऊ सुपर जायंट्सच्या जोश इंग्लिस ८ कोटी, अनरिक नॉर्खिया २ कोटी, वानिंदू हसरंगा २ कोटी, राजस्थान रॉयल्सच्या रवी बिश्नोई ७ कोटी, ॲडम मिल्ने २ कोटी, पंजाब किंग्सच्या बेन ड्वारशियस ४ कोटी, गुजरात टायटन्सच्या जेसन होल्डर ७ कोटी, टॉम बँटन २ कोटी यांचा समावेश आहे. कोट्यवधी रुपयांची बोली लावून विकत घेतलेले खेळाडू हाही एक प्रकारचा जुगार आहे. अनेकदा करोडो रुपये खर्चून खरेदी केलेले खेळाडू फ्लॉप ठरतात, तर काही लाखांमध्ये खरेदी केलेले खेळाडू स्पर्धा गाजवून जातात. या स्पर्धेत अनेक विक्रम रचले जातात. अनेक फलंदाज शतकी खेळीने नावारूपाला येतात. अर्थात आयपीएल गाजविणारे खेळाडू राष्ट्रीय स्पर्धा, कसोटी, एकदिवसीय सामने, टी-२० सामन्यांमध्ये फ्लॉप ठरतात. क्रिकेट खेळाचा खरा कस हा कसोटी सामन्यांमध्ये लागतो. दिवसाला ९० षटकांप्रमाणे पाच दिवस खेळून काढायचे असतात. एकदिवसीय सामन्यांमध्ये शंभर षटके मैदानावर उभे राहायचे असते. त्यामुळे आयपीएल गाजविणाऱ्यांचा खेळ कसोटी तसेच एकदिवसीय सामन्यांमध्ये फिका पडतो. टी-२० सामन्यांच्या अतिरेकामुळे कसोटी सामने अलीकडच्या काळात अडीच ते तीन दिवसांमध्ये निकाली लागतात. अर्थात टी-२०च्या वाढत्या लोकप्रियतेमुळे व आयपीएल स्पर्धेमुळे अनेक खेळाडू नावारूपाला आलेत. आयपीएल २०२६च्या रणसंग्रामासाठी संघ ठरले आहेत. संघामधील सरदारांचीही आता निवड झाली.

# प्रा. डॉ. स्मिता अवचार : समाजशास्त्राच्या सेवाव्रतापासून ते जीवनगौरवापर्यंत : डॉ. राजेंद्र बगाटे



महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्रीय परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांचे कार्य केवळ विद्यापीठीय चौकटीत मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या वैचारिक जडणघडणीचा अविभाज्य भाग बनते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम आहेत. समाजशास्त्र या विषयाला मानवी संवेदनशीलतेची, सामाजिक बांधिलकीची आणि शास्त्रीय काटेकोरतेची जोड देत त्यांनी जे दीर्घकालीन कार्य केले आहे, त्याची दखल घेत महाराष्ट्रातील मराठी समाजशास्त्र परिषद यांच्यातर्फे देण्यात येणारा २०२५-२६ चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. दि. १७-१८ फेब्रुवारी रोजी नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३५व्या राष्ट्रीय अधिवेशनात हा सन्मान मराठी समाजशास्त्र परिषेदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक आणि भारतीय समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीप्ती रंजन साहू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आणि महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रात एक गौरवशाली क्षण नोंदवला गेला आहे.

हा पुरस्कार केवळ एका प्राध्यापिकेच्या प्रदीर्घ सेवेला दिलेली औपचारिक मान्यता नाही, तर समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेला दिलेली दाद आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवून समाजशास्त्राला 'माणसांशी जोडलेला विषय' बनवण्याचे कार्य प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा शेवट नसून, त्यांच्या सेवाव्रताची सार्वजनिक कबुली आहे.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचा शैक्षणिक प्रवास हा सातत्य, चिकाटी आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचा सुंदर संगम आहे. एम.ए., एम.फिल., डी.एच.ई. आणि पीएच.डी. या शैक्षणिक टप्प्यांतून त्यांनी समाजशास्त्राच्या मूलभूत संकल्पना, सिद्धांत आणि संशोधन पद्धती यांचे सखोल ज्ञान प्राप्त केले. मात्र, त्यांच्या शिक्षणाचा उद्देश केवळ पदव्या मिळवणे हा कधीच नव्हता. समाज समजून घेणे, समाजातील प्रश्न ओळखणे आणि त्या प्रश्नांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणे, हा त्यांच्या अभ्यासाचा खरा गाभा राहिला.

समाजशास्त्र हा विषय त्यांनी केवळ सैद्धांतिक पातळीवर न ठेवता तो समाजाशी संवाद साधणारा बनवला. सामाजिक बदल, विकास प्रक्रिया, कुटुंबसंस्था, लिंगभाव, स्त्री-पुरुष संबंध, वृद्धत्व, शहरीकरण आणि ग्रामीण वास्तव या सर्व विषयांकडे त्यांनी संवेदनशीलतेने आणि वस्तुनिष्ठतेने पाहिले. त्यामुळेच त्यांचा शैक्षणिक प्रवास हा 'पुस्तकांतील समाज' आणि 'प्रत्यक्षातील समाज' यांच्यातील दरी भरून काढणारा ठरतो.

त्यांचे दीर्घकालीन अध्यापन कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील समाजशास्त्र विभागाशी निगडित आहे. विद्यापीठीय प्राध्यापिका आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी पदव्युत्तर स्तरावर समाजशास्त्र विषयाचे अध्यापन केले. वर्गखोलीतील त्यांचे अध्यापन हे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर विद्यार्थ्यांमध्ये समाजाकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी निर्माण करणारे होते. सामाजिक घटनांचे विश्लेषण, प्रत्यक्ष उदाहरणे, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि संशोधनातील शिस्त या सर्वांचा समन्वय त्यांच्या अध्यापनात दिसून येतो.

समाजशास्त्र शिकवताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला, निरीक्षण करायला आणि निष्कर्ष काढायला शिकवले. 'समाजशास्त्र म्हणजे केवळ उत्तरांचा संच नव्हे, तर प्रश्न विचारण्याची शिस्त आहे,' ही भूमिका त्यांच्या अध्यापनातून सातत्याने व्यक्त होत राहिली. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ परीक्षाभिमुख तयारी नव्हे, तर संशोधनाभिमुख विचारसरणी विकसित झाली.

अध्यापनाबरोबरच संशोधन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक जीवनाचे मुख्य केंद्र राहिले. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, विकासाचे समाजशास्त्र, लिंगभाव आणि समाज तसेच वृद्धत्वाचे समाजशास्त्र ही त्यांची विशेष अभ्यासक्षेत्रे आहेत. या



डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे एम.ए., नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) चे विद्यार्थी आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

क्षेत्रांतील त्यांचे संशोधन केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले आहे. कौटुंबिक बदल, शहरीकरण, औद्योगिकीकरण, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे प्रश्न, कौटुंबिक हिंसाचार आणि दारूबंदी चळवळ यांसारख्या विषयांवर त्यांनी केलेले संशोधन समाजातील बदलत्या प्रक्रिया स्पष्ट करणारे ठरत आहे.

विकासाचे समाजशास्त्र या क्षेत्रात त्यांनी विकास प्रक्रियेचा मानवी पैलू अधोरेखित केला. विकास म्हणजे केवळ आर्थिक वाढ नसून सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी सन्मान यांचा समतोल असावा, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. ग्रामीण आणि शहरी समाजातील विकासातील तफावत, स्वयं-सहायता गटांचे सामाजिक परिणाम आणि महिलांचे सक्षमीकरण यावरील त्यांच्या संशोधनातून विकासाच्या संकल्पनेला व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे.

लिंगभाव आणि समाज या विषयावर त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायदेशीर तरतुदींमध्ये मर्यादित न राहता ती सामाजिक व्यवहारात कशी प्रकट होते, याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. महिलांवरील हिंसाचार, कौटुंबिक नातेसंबंध, कामगार क्षेत्रातील महिलांची स्थिती आणि दारूबंदी चळवळीत महिलांची भूमिका अशा विषयांवरील त्यांच्या संशोधनातून लिंगभाव असमानतेची संरचनात्मक कारणे स्पष्ट झाली आहेत. त्यांच्या लेखनात स्त्री ही केवळ अभ्यासविषय न राहता सामाजिक परिवर्तनाची सक्रिय घटक म्हणून समोर आली आहे. वृद्धत्वाचे समाजशास्त्र हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा आयाम आहे. बदलत्या कुटुंबव्यवस्थेमुळे वृद्धांच्या जीवनावर होणारे परिणाम, वृद्धाश्रमांची वाढ, वृद्धांचे सामाजिक-मानसिक प्रश्न आणि कौटुंबिक आधाराचा अभाव या विषयांवरील त्यांच्या संशोधनाने वृद्धत्वाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले. वृद्ध ही केवळ कल्याणकारी योजनांची लक्ष्यगट नसून सन्मानाने जगण्याचा हक्क असलेली व्यक्ती आहे, ही भूमिका त्यांच्या संशोधनातून ठळकपणे व्यक्त झाली आहे. संशोधन मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. एम. ए., एम.फिल. आणि पीएच.डी., आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) स्तरावर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. या संशोधन प्रबंधांचे विषय पाहिले, तर समाजातील विविध घटकांचे जीवनविश्व उलगडताना दिसते. दलित व मागासवर्गीय समाज, आदिवासी समुदाय, कामगार, महिला, वृद्ध, अपंग, विधीसंघार्षित बालके, पोलीस व्यवस्था, स्वयं-सहायता गट आणि विस्थापित लोकसंख्या इत्यादी. या संशोधनातून समाजातील संरचनात्मक विषमता, सामाजिक नियंत्रण आणि बदलत्या सामाजिक मूल्यांचे विश्लेषण झाले.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना अनमोल मार्गदर्शन लाभले आहे, तर पीएच.डी. पदवी संशोधनासाठी डॉ. ए.डी. साबळे, डॉ. डी.एस. कोरे, डॉ. स्नेहलता मानकर, डॉ. नारायण बोराडे, डॉ. सुनिता अंकुश (वाघमारे), डॉ. डी.डी. घोडगे, डॉ. डी.एल. तोरवणे, डॉ. अरुंधती पाटील, डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. शिवकुमार सोळंके, डॉ. शोभा इंगळे, डॉ. राजेंद्र बगाटे, डॉ. आरती धनवे, डॉ. मंगलमुर्ती धोकटे, डॉ. संदीप चौधरी, डॉ. रुपसी दास, डॉ. गणेश मोकासरे, डॉ. रेवणनाथ काळे, डॉ. अंबिका दत्ता, डॉ. वैशाली जाधव, सुजाता पाटील आणि सविता कोटूरी इत्यादी संशोधकांना अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे. तसेच अनेक माझ्यासह अनेक विद्यार्थ्यांना एम.फिल. पदवीसाठी अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे.

मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक सूचना दिल्या नाहीत, तर संशोधनातील नैतिकता आणि सामाजिक जबाबदारीचे भान दिले. माहिती संकलन करताना प्रतिसादकर्त्यांचा सन्मान, निष्कर्ष मांडताना वस्तुनिष्ठता आणि निष्कर्षांचा समाजासाठी होणारा उपयोग या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले संशोधन केवळ विद्यापीठीय निकष पूर्ण करणारे न राहता समाजोपयोगी ठरत आहे.

पोस्ट-डॉक्टोरल (पी.डी.एफ.) संशोधन मार्गदर्शन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक कार्याचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आय.सी.एस.एस.आर.), नवी दिल्ली अंतर्गत त्यांनी पोस्ट-डॉक्टोरल (पी.डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना "प्रॉब्लेम्स ऑफ एल्डरली लिविंग इन ओल्ड एज होम्स इन महाराष्ट्रा' या वृद्धांशी संबंधित संशोधन विषयावर मार्गदर्शन केले आहे. महाराष्ट्रात समाजशास्त्र विषयातील पहिल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनाची परंपरा घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. वृद्धाश्रमातील वृद्धांचे सामाजिक, आर्थिक आणि मानसिक प्रश्न, त्यांची सामाजिक-मानसिक अवस्था, कौटुंबिक नात्यांतील बदल, कौटुंबिक आधाराचा अभाव आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रश्न या विषयावर झालेल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनातून समाजधोरणांसाठी उपयुक्त निष्कर्ष पुढे आले आहेत.

ग्रंथनिर्मिती आणि लेखन हे त्यांच्या शैक्षणिक योगदानाचे महत्त्वाचे साधन राहिले आहे. समाजशास्त्रीय संज्ञा, स्वयं-सहायता गट आणि लिंगभाव समता यांसारख्या विषयांवरील त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरली. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत त्यांनी लेखन केले असून, त्यामुळे स्थानिक सामाजिक प्रश्नांची मांडणी व्यापक शैक्षणिक वर्तुळात पोहोचली आहे. संशोधन नियतकालिके, संपादित ग्रंथ आणि परिषद कार्यवृत्तांमधील त्यांचे लेख समाजशास्त्रीय चर्चेला दिशा देणारे ठरले आहेत.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभागाने त्यांच्या कार्याला व्यापक परिमाण लाभले. वृद्धत्व, लिंगभाव असमानता, विश्रांतीकालीन जीवन आणि सामाजिक विकास अशा विषयांवरील शोधनिबंध त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर केले. या अनुभवांचा लाभ त्यांच्या अध्यापन आणि संशोधनात झाला आणि भारतीय समाजातील प्रश्नांचे जागतिक समाजशास्त्रीय चौकटीत विश्लेषण शक्य झाले.

समाजशास्त्र हे केवळ अकादमिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते सामाजिक कृतीशी जोडलेले असावे, हा विश्वास त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. महिला संघटना, महिला सुरक्षा समित्या, जनशिक्षण संस्थान आणि ग्राहक चळवळीतील सहभागातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. संशोधनातून निष्पन्न झालेले निष्कर्ष समाजकार्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष समाजात उतरवण्याचा त्यांचा प्रयत्न सातत्याने दिसतो.

विद्यापीठीय प्रशासन आणि शिक्षक संघटनांमध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक वर्ष त्या समाजशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख राहिल्या असून त्यांनी विद्यापीठांमध्ये अधिसभा सदस्यासह अनेक महत्वपूर्ण पदांवर काम केले आहे. या पदांवर असतांना त्यांनी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यापैकी कुणालाही त्रास दिलेला नाही, तर प्रत्येकाच्या अडचणी समजून घेवून त्या सोडवल्या आहेत आणि आज पण सोडवत आहेत. शिक्षक संघटनेतील जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी शैक्षणिक लोकशाही, पारदर्शकता आणि सहकार्य या मूल्यांचा पुरस्कार केला. सहकारी आणि कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी त्या नेहमीच मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान राहिल्या आहेत.

प्रा. डॉ. स्मिता अवचार यांच्या कार्याचे सर्वात प्रभावी प्रतिबिंब म्हणजे गुरू-शिष्य परंपरा होय. गुरू म्हणून त्यांनी अधिकार गाजवण्याऐवजी विश्वास निर्माण केला. संशोधनातील अडचणी, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि सैद्धांतिक संभ्रम या सर्व बाबींवर त्यांनी संयमाने मार्गदर्शन केले. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ संशोधक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्या जागरूक माणसे घडली आहेत.

या संदर्भात माझा म्हणजेच डॉ. राजेंद्र बगाटे यांचा वैयक्तिक अनुभव विशेष उल्लेखनीय ठरतो. एम.ए., नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) संशोधन या सर्व शैक्षणिक टप्प्यांवर एकाच गुरूच्या मार्गदर्शनाखाली घडणे ही दुर्मीळ बाब आहे. या संपूर्ण प्रवासात प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी केवळ संशोधनविषयक मार्गदर्शन केले नाही, तर शैक्षणिक प्रामाणिकपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीची मूल्ये रुजवली आहेत. संशोधन म्हणजे केवळ पदवी मिळवणे नसून समाजासाठी काहीतरी देण्याची जबाबदारी आहे, ही शिकवण त्यांच्या मार्गदर्शनातून मिळाली आहे.

प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना देण्यात आलेल्या जीवन गौरव पुरस्काराचे महत्त्व या सर्व पार्श्वभूमीवर अधिक खोलवर समजते. हा पुरस्कार म्हणजे प्रदीर्घ सेवेला दिलेला सन्मान असला, तरी तो समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेची सार्वजनिक कबुली आहे. समाजातील दुर्बल घटकांचे प्रश्न, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे सन्मानजनक जीवन आणि विकासातील मानवी पैलू या सर्व विषयांना शास्त्रीय अधिष्ठान देण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. त्याचीच ही औपचारिक पावती आहे.

समारोप करताना असे म्हणावे लागेल की, प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना प्रदान करण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या वैयक्तिक यशाचा क्षण असला, तरी तो महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. समाजशास्त्राच्या माध्यमातून समाज अधिक समताधिष्ठित, संवेदनशील आणि न्याय्य व्हावा, या उद्देशाने त्यांनी जे कार्य केले, त्याची दखल या पुरस्कारातून घेतली गेली आहे. त्यांच्या ज्ञानाने, मार्गदर्शनाने आणि मूल्यांनी घडलेली पिढी हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. समाजशास्त्राच्या सेवाव्रताचा हा प्रवास दीर्घकाळ प्रेरणादायी ठरो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

# सांगली जिल्हा एकवटला मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी !

## सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन; २७ रोजी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी होणार विजेत्यांचा सन्मान !

*माझ्या मराठीची बोलू कौतुके,*
*परी अमृतातेही पैजा जिंके,*
*साहित्याचा सुगंध, शब्दांचा अलंकार,*
*ज्ञानदेवांच्या ओळीत मराठीचा मान*

या ज्ञानेश्वरांच्या काव्यपंक्तीने मराठी भाषेचा झालेला सन्मान मराठी भाषेच्या संवर्धनास व्यापक गती देणारा आहे. सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनातून सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने मराठी भाषा संवर्धना निमित्त संपूर्ण जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्याबरोबरच मराठी भाषा ग्रामीण आणि शहरी भागात सर्वदूर पसरविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन संपूर्ण जिल्ह्यात करण्यात आले आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सांगली जिल्हा परिषदेचे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांनी दिली. मराठी भाषा दिन दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस प्रसिद्ध कवी व साहित्यिक कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस आहे. त्यांनी मराठी साहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेला दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टिकोनातून मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टिकोनातून हा दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो.



वि. वा. शिरवाडकर

भारतातील प्रमुख भाषापैकी मराठी ही एक भाषा आहे. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा म्हणून मराठीला मान्यता मिळाली आहे.

नवीन पिढीमध्ये मराठी भाषेबद्दल अभिमान निर्माण करणे, मराठी भाषेचा गौरव आणि प्रसार करणे, मराठी साहित्य, संस्कृती आणि परंपरेचे जतन करणे ही, नवीन पिढी पुढची मराठी भाषा संवर्धनासाठी आव्हाने आहेत.

या दृष्टिकोनातून सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी या तीन गटात अभिवाचन स्पर्धा शाळा, केंद्र तालुका आणि जिल्हास्तरावर अभिवाचन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चारोळी घोषवाक्य लेखन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा , पोस्टर्स स्पर्धा मराठी सुलेखन हस्ताक्षर स्पर्धा या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



मोहनराव गायकवाड
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सांगली

सोमवार दिनांक २३पासून बुधवार दिनांक २५ फेब्रुवारीपर्यंत या स्पर्धा शाळा, केंद्र, तालुका आणि जिल्हास्तरावर घेतल्या जाणार आहेत. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीसाठी खुलागट केला असून ऑनलाइन पद्धतीने अभिवाचन स्पर्धेचे आयोजन केंद्र तालुका आणि जिल्हास्तरावर करण्यात आले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी खुल्या गटातून वक्तृत्व स्पर्धांचे सादरीकरण ऑडिओ आणि व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून केंद्र तालुका आणि जिल्हास्तरावर होणार आहे. निबंध स्पर्धेसाठी इयत्ता, वयोगटानुसार शब्द मर्यादा देऊन नियोजन करण्यात आले आहे.

या सर्व स्पर्धा आणि उपक्रमांच्यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अधिक बळकटी येईल, मराठी भाषेचा प्रचार, प्रसार अधिक ताकदीने होईल या दृष्टिकोनातून विविध स्पर्धांचे विषय, वेळ, शब्द मर्यादा निश्चित केली गेली आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी पुस्तक वाचन अभिप्राय स्पर्धा, ऑनलाईन पद्धतीने केंद्र, तालुका आणि जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आले आहे. या सर्व स्पर्धांचे निकष परिपत्रकाच्या माध्यमातून सर्व जिल्ह्यातील शाळांपर्यंत पोहोचवले आहेत.

प्रत्येक स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम किंवा पुस्तके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जिल्हास्तरावरही प्रत्येक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विजेत्याला प्रमाणपत्र, रोख रक्कम किंवा पुस्तके देऊन सर्वांना सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होऊन स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या सर्व स्पर्धकांचा यथोचित सन्मान जिल्हास्तरावर माननीय जिल्हाधिकारी सांगली, माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली आणि मान्यवरांच्या हस्ते दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी समारंभात केला जाणार आहे.

शब्दांकन : दीपक रोकडे
जि. प. शाळा काळमवाडी
९७६७६५२२२४

संकलन
डॉ. विमल माने
उपशिक्षणाधिकारी
जिल्हा परिषद सांगली
९८३४९०५३००

या विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपशिक्षणाधिकारी डॉ. विमल माने, ग्रामीण कथाकार बाबासाहेब परीट, प्रसिद्ध कवयित्री डॉ. स्वाती शिंदे, शिक्षक साहित्यिक दयासागर बन्ने, गौतम कांबळे, विठ्ठल मोहिते, दीपक रोकडे उपक्रम पार पाडण्यासाठी नियोजन आणि संयोजन करत आहेत.

सांगली जिल्हा परिषदेने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध उपक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन करून मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी टाकलेले हे एक पाऊल लाखमोलाच आहे, हे निश्चित !

सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनातून दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मराठी भाषा संवर्धनासाठी मराठी भाषा पंधरवडा हा उपक्रम सांगली जिल्ह्यात साजरा केला जात आहे. यानिमित्ताने मराठी भाषा सर्वदूर पसरवण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विविध स्पर्धांचे आयोजन करून यामध्ये जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना सहभागीय करण्यात आले आहे. यशस्वी विजेत्यांना दिनांक २७ रोजी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी माननीय जिल्हाधिकारी, माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रचारासाठी व्यापक प्रयत्न केले जात आहेत.

*संतांची वाणी,*
*वीरांचा जयघोष*
*मराठीमध्ये दडलेला*
*इतिहासाचा जोश |*
*बोलू, लिहू, वाचू,*
*तिची गोड कहाणी*
*मराठीच आहे आपल्या*
*ओळखीचे निशाणी ||*

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## माझ्या दिव्यांग व शिक्षक बांधवांना तसेच गुणी विद्यार्थ्यांना अच्छे दिन यावेत यासाठी रोजा धरणार : राजेंद्र लाड



■ कडा - (प्रतिनिधी)

हिंदू, मुस्लिम, शिख, इसाई.... हम सब भाई - भाई असे नुसते बोलून चालणार नाही तर प्रत्येक धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जात असतात. प्रत्येक धर्माच्या सणाला अनन्यसाधारण महत्त्व असते. तसेच प्रत्येक धर्माच्या सणामधून वेगवेगळे संदेश दिले जात असतात. सणामुळे एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माच्या बांधवांना शुभेच्छा देत असतात. नव्हे नव्हे तर एकमेकांच्या सुख - दुखाःत सामील होत असतात. याच विचाराचा आधार घेवून माझ्या दिव्यांग व शिक्षक बांधवांना तसेच गुणी विद्यार्थ्यांना भविष्यात अच्छे दिन यावेत व दिव्यांग हक्क कायदा २०१६ ची राज्यात कडक अंमलबजावणी व्हावी, दिव्यांगांच्या व शिक्षकांच्या अडीअडचणी दूर व्हाव्यात, गुणी विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, दिव्यांग बांधवांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी समाजाकडून व शासनाकडून सोयी - सवलती मिळाव्यात या उद्दात हेतुने इस्लाम धर्माच्या पवित्र रमजान महिन्यामध्ये दिव्यांगाप्रती व शिक्षकांप्रती तसेच गुणी विद्यार्थ्यांप्रती आदर ठेवून व मनोमन भावना घेवून अल्लाह यांना दुवा मागण्यासाठी सालाबादप्रमाणे शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ व रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी दोन दिवसाचा रोजा धरणार आहे. अशी माहिती शासन मान्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी दिली आहे.

शाळेमध्ये शिक्षक मुलांना सर्वधर्म समभाव यांची शिकवण देत असतात. पण त्याचा प्रत्यक्षात किती प्रमाणात अवलंब केला जातो हे ज्यांच्या - त्यांच्या शिकवणीवर अवलंबून असते. पण खऱ्याअर्थाने सर्वधर्म समभाव ही मोठमोठाली शब्द वापरुन चालणार नाही तर त्याची स्वतः पासून अंमलबजावणी करणे अभिप्रेत असते. त्यामुळेच मी स्वतः शिक्षक या नात्याने सर्वधर्माच्या सणामध्ये प्रत्यक्ष सामील होत असतोच. तसेच प्रत्येक धर्मामध्ये संस्काराला खुप महत्त्व असते. कोणताही धर्म वाईट विचार सांगत नसून भारतातील सर्व धर्माच्या सणाला खुपच महत्त्व असून त्यातून खऱ्याअर्थाने संस्कार, आचार - विचार, चांगले - वाईट यांची शिकवण दिली जात असते.

याचप्रमाणे सध्या मुस्लिम बांधवांचा रमजान महिना चालू असून रमजान ला इस्लाम धर्मात फारच मोठे स्थान दिलेले असून इस्लाम धर्मानुसार रमजान महिन्यात रोजा धरल्यामुळे आत्मा पवित्र होत असतो व अध्यात्मिक तसेच शारीरिक रुप शुद्ध होत असते. यातून संयम, प्रेम, अनुशासन यांची रुजवणूक होत असते.

यामुळेच मुस्लिम बांधव सध्या दिवसभर उपवास करत असतात व अल्लाह यांना दुवा मागत असतात. त्यामुळेच मुस्लिम बांधवांच्या या पवित्र महिन्यातील उपवासात आपणही सामील झाले पाहिजे याच एका उद्दात विचाराने दिव्यांग व शिक्षक बांधवांना तसेच विद्यार्थ्यांना अच्छे दिन यावेत यासाठी व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी दोन दिवसाचा सालाबादप्रमाणेच रोजा धरणार आहे. या दोन दिवासाच्या उपवासाच्या काळात दिव्यांग बांधवांना तन, मन, धनाने मदतही करणार आहे असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी म्हटले आहे.

## 'माझी वसुंधरा' अभियानात मान्याचीवाडी राज्यात अव्वल राज्यपाल व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते एक कोटींचा पुरस्कार

■ मुंबई (वृत्तसंस्था) :




पर्यावरण संवर्धन, अपारंपरिक ऊर्जा व स्वच्छतेच्या प्रभावी उपक्रमांमुळे पाटोदा तालुक्यातील मान्याचीवाडी ग्रामपंचायतीने 'माझी वसुंधरा' अभियान स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावत मानाचा तुरा रोवला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्यपाल व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते ग्रामपंचायतीला एक कोटी रुपयांचा भव्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मुंबई येथे झालेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत मान्याचीवाडी ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी पुरस्कार स्वीकारला. पर्यावरणपूरक उपक्रम, ऊर्जा बचत, जलसंवर्धन, वृक्षारोपण, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती या पंचतत्वांवर आधारित उत्कृष्ट कामगिरीमुळे ग्रामपंचायतीची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली.

मान्याचीवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच खंडेराव माने, सदस्य दिलीप गुंजाळकर, उत्तमराव माने, पोलिस पाटील विकास माने, अधिकारी माने, इंदूती माने, सुरेखा माने, उपसरपंच माने, रमेश गुंजाळकर आदी पदाधिकाऱ्यांनी सातत्याने राबविलेल्या पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे गावाने सलग तिसऱ्या वर्षीही स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत ग्रामपंचायतीमार्फत घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी पुनर्वापर, सौरऊर्जा, बायोगॅस, प्लास्टिक मुक्ती, वृक्षसंवर्धन आणि हरित उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. ग्रामीण व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य

संस्थांच्या पर्यावरणीय कामगिरीचे पंचतत्वांवर मूल्यमापन केले जात असून, त्यामध्ये मान्याचीवाडीने आदर्श कामगिरी करत राज्यात अव्वल स्थान पटकावले.

या यशाबद्दल पालकमंत्री धनंजय देशाई, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीचे अभिनंदन केले आहे. गावाच्या या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.


## गाव समूहाचा शेतकरी कीर्तन महोत्सव यंदा ही रंगणार

### किरण माने, मयांक गांधी, विलास बडे, पैगंबर शेख, स्वप्निल चौधरी, अजित अभ्यंकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती

■ परळी / प्रतिनिधी

शाश्वत शेती, माती आणि माणूस याला केंद्रभूत मानून तुकाराम बीजेनिमित्ताने मागील 4 वर्षांपासून परळी, अंबाजोगाई व धारूर तालुक्यातील 25 पेक्षा अधिक गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत सुरू केलेला शेतकरी कीर्तन महोत्सव जिल्ह्यातील अभिनव प्रबोधन महोत्सव म्हणून ओळखला जात असून या किर्तन महोत्सवाची महाराष्ट्रभर उत्सुकता असते. यावर्षीच्या शेतकरी कीर्तन महोत्सवात सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मयांक गांधी, ज्येष्ठ पत्रकार विलास बडे, सामाजिक कार्यकर्ते पैगंबर शेख, प्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती शेतकरी कीर्तन महोत्सवाचे संयोजक एड. अजय बुरांडे यांनी दिली.

जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या बिजोत्सवाच्या निमित्ताने 28 फेब्रुवारी ते 6 मार्च यादरम्यान यावर्षीचा




शेतकरी कीर्तन महोत्सव होत आहे. जगद्गुरु तुकाराम महाराजांचा बीजोत्सव जवळ येऊ लागतो तसा परळी तालुक्यासह इतर तालुक्यातील शेतकऱ्यांना कीर्तन महोत्सवाची उत्सुकता लागून राहते. धारूर तालुक्यातील कान्नापूर येथे होणाऱ्या कीर्तन महोत्सवात पारंपारिक कीर्तनाबरोबरच शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांचे आरोग्य, शेतीवर होणारे पर्यावरणाचे परिणाम, शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती आणि त्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना, यावर या शेतकरी कीर्तन महोत्सवात विचार मंथन होत असते. शेतकरी कीर्तन महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे उच्च दर्जाचे वैचारिक प्रबोधन होत असतानाच या कीर्तन महोत्सवातून सर्वसामान्यांचे आर्थिक शोषण होणार नाही याची काळजी घेतली जाते. 25 गावांचा हा कीर्तन महोत्सव असला तरी अत्यंत साधेपणाने तितकेच नेटकेपणा याचे आयोजन केले जाते. भपकेबाजपणा टाळण्यासाठी दररोज एका गावातून भाकरी गोळा केल्या जातात. कीर्तन मंडपात एखादी भाजी तयार केली जाते. आपल्या घरातील एक भाकर शेतकरी कीर्तन महोत्सवाला जाते आहे या भावनेतून ही सर्व कुटुंब शेतकरी महोत्सवाशी जोडले जातात. हा नवा प्रयोग गेली चार वर्षे कान्नापूर परिसरात केला जातो. यावर्षी या कीर्तन महोत्सवात दिग्गज प्रबोधनकारांचे आणि कीर्तनकारांचे मार्गदर्शन लाभणार आहे. शनिवार दि 28 रोजी या सोहळ्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेते आणि समाजभान असणारे सामाजिक कार्यकर्ते किरण माने, कैकाडी महाराज मठाचे प्रमुख भारत महाराज जाधव, जागतिक कीर्तीचे मृदंग वादक उद्धव बापू आपेगावकर यांची उपस्थिती असणार आहे. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न स्वतः शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मांडणारे, प्रसंगी कमरे इतक्या पाण्यात उतरून वस्तुस्थिती जगासमोर आणणारे पत्रकार विलास बडे, विविध प्रयोगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणारे मयांक गांधी, शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नावर थेट भूमिका घेणारे पैगंबर शेख, सुप्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांची यावर्षी व्याख्याने होणार आहेत. मधुकर महाराज बारूळकर, अविनाश महाराज भारती, जनक महाराज सोळंके, गणपत महाराज पवार, एकनाथ महाराज माने , ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांची कीर्तने होणार आहेत, तर शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याचे किर्तनाने या कीर्तन महोत्सवाची सांगता होईल, अशी माहिती शेतकरी एड.अजय बुरांडे यांनी दिली.

## तलाह आसिफ शेख व हमजा अफजल शेख या दोन चिमुकल्यांचा पहिला रोजा पुर्ण

■ कडा - (प्रतिनिधी)

मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे आष्टी शहरातील दारू गल्ली येथील रहिवाशी असलेले शेख अफजल , व शेख आसिफ यांच्यातून चिमुकल्यांनी त्यांच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला आहे. यावर्षीचा पवित्र रमजान महिना 18 फेब्रुवारी 2026 पासून रोजीच्या सायंकाळ पासून आरंभ झाला. या पवित्र रमजान महिन्याचा पहिला रोजा शुक्रवारी दि.20 फेब्रुवारी रोजी होता. हा पहिला रोजा आष्टी येथील इयत्ता पहिलीत शिक्षण घेणाऱ्या तलाह आसिफ शेख (वय 6 वर्ष)व इयत्ता तिसरी शिक्षण घेणारा हमजा अफजल शेख (वय ९ वर्ष)या दोन्हीही चिमुकल्यांनी (वय ९ वर्ष),या दोन भावांनी धरला होता. या दोघांनी दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्याबद्दल नातेवाईक व इतरांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले.



## रोगराईचे संकट ! गटार तुंबल्याने रामनगर (अ) परिसरात घाणीचे साम्राज्य ; परिसरातील नागरिक हैराण

■ घाटकोपर,(केतन भोज)

प्रभाग क्रमांक १२७ मधील रामनगर (अ) येथील शंकर मंदिर शेजारील पाण्याच्या टाकी मागील मुख्य गटाराची अत्यंत दुरवस्था झाली आहे.हे गटार तुंबलेल्या अवस्थेत असून या गटारामधील सर्व घाणीचे पाणी मोठ्या प्रमाणावर मुख्य रस्त्यावर येत असून,येथील स्थानिक नागरिकांना तसेच शाळकरी मुलांना या तुंबलेल्या गटाराच्या पाण्यातूनच येजा करावी लागत आहे.परिणामी यामुळे स्थानिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.तसेच मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असलेल्या या परिसरातील नागरिकांचे आरोग्य यामुळे धोक्यात आले आहे.या तुंबलेल्या गटारामुळे याठिकाणी डासांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढला आहे.त्यामुळे येथील नागरिकांना डेंग्यू सदृश्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.तसेच बाजूलाच येथील संपूर्ण विभागला पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकी असून या पाण्याच्या टाकी मध्ये देखील या तुंबलेल्या गटाराचे घाणीचे पाणी जात असून यामुळे स्थानिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न याठिकाणी उद्भवत आहे.या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते अँड.करण इंगवले यांनी संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाने यासंदर्भात वेळेवेळी तक्रारी केल्या तरी ही मनपा एन विभाग प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही.मनपा एन विभाग प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून देखील ते याकडे कानाडोळा करताना दिसत आहेत.

तरी संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाकडून या तुंबलेल्या गटाराची त्वरित



स्वच्छता करण्यात यावी.तसेच दुरवस्था झालेल्या या गटाराचे व्यवस्थित बांधकाम करणे देखील गरजेचे आहे.अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहे.

येथील स्थानिक नागरिकांना निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींकडून फक्त विकासाची आश्वासने देण्यात आली होती,पण वास्तवात मात्र नागरिकांना याठिकाणी मोठ्या प्राणावर घाणीचा त्रास सहन करावा लागत आहे.तरी येथील स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांसाठी याठिकाणी कोणीही वाली नसल्याचे दिसत आहे.तसेच मनपा एन विभाग प्रशासनाकडून या गंभीर समस्येबाबत कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना होत नसून,वारंवार तक्रारी करुन देखील त्यांच्याकडून यावर कार्यवाही शून्य कारभार होताना दिसत आहे.




## महा पशुधन एक्सपोमध्ये नामवंत कलावंतांचा गौरव; आयोजकांप्रती कृतज्ञता व्यक्त

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

परळी वैजनाथ शहरात आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय महा पशुधन एक्सपोदरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने उपस्थित राहिलेल्या दोन नामवंत कलावंतांचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या वेळी इंडियन आयडलमधून लोकप्रिय झालेल्या गायिका अश्विनी मेटे तसेच 'कोणता झेंडा घेऊ हाती' या गाण्याचे गायक ज्ञानेश्वर मेश्राम (आळंदी, पुणे) यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कलेचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमावेळी अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष रामेश्वर महाराज कोकाटे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष व पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी धनंजय आरबुने, माहिती अधिकार संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष नितीन ढाकणे, तसेच 'परळी लाईव्ह न्यूज' या युट्युब चॅनलचे मुदस्सिर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या भव्य एक्सपोमुळे परळी शहराच्या सांस्कृतिक व सामाजिक वातावरणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, कलावंतांचा झालेला सन्मान हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. आयोजकांनी दिलेल्या या सन्मानाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## आंगणेवाडी यात्रोत्सवासाठी एसटी प्रशासन झाले सज्ज, जादा 135 बसेसचे नियोजन

■ कणकवली : वृत्तसंस्था

कोकणची काशी म्हणून ओळखली जाणारी आंगणेवाडी येथील श्री भराडी देवीची यात्रा ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या सिंधुदुर्ग विभागातून विविध मार्गावर जादा १३५ एसटी बसेस सोडण्यात येणार आहेत. १० फेब्रुवारी पर्यंत ही व्यवस्था करण्यात आली आहे. यात कुडाळ - आंगणेवाडी १५, वेंगुर्ला आगारासाठी कुडाळ - आंगणेवाडी १०, कसाल - हिवाळे - आंगणेवाडी ४, कसाल - खोटले - आंगणेवाडी ५, निरुखे - पांग्रड आंगणेवाडी ३, पणदूर - ओरोस आंगणेवाडी १ अशा कुडाळ आगारातून ३८ बसेस सोडण्यात येणार आहेत.

मालवण आगारातून मालवण - आंगणेवाडी १०, सावंतवाडी आगारासाठी मालवण - आंगणेवाडी १३, देवबाग तारकर्ली - आंगणेवाडी २, आनंदव्हाळ आंगणेवाडी, डांगमोडे - आंगणेवाडी, सर्जेकोट - आंगणेवाडी, मालोंड - आंगणेवाडी, देवली - वायरी - आंगणेवाडी, वराड - आंगणेवाडी, तळगाव - सुकळवाड - आंगणेवाडी, तिरवडे आंगणेवाडी, कट्टा आंगणेवाडी, धामापूर - आंगणेवाडी अशी प्रत्येकी एक बस, मसुरे आंगणेवाडी ४, चौके आंगणेवाडी २ अशा मालवण आगारातून ४१ बसेस सोडण्यात येतील.

कणकवली आगारातून २६, विजयदुर्ग आगारासाठी ५, सावंतवाडी आगारासाठी १०, असगणी - असरोंडी - आंगणेवाडी २ अशा ४३ बसेस कणकवली आगारातून सोडण्यात येणार आहेत.

देवगड आगारातून देवगड - आंगणेवाडी, हिंदळे - मुणगे - आंगणेवाडी प्रत्येकी २, आचरा - आंगणेवाडी ३, तोंडवली - तळाशील - आंगणेवाडी, कुडोपी आंगणेवाडी, आरे आंगणेवाडी, आचरा चिंदर बांदिवडे - आंगणेवाडी अशी प्रत्येकी १ अशा ११ बसेस देवगड आगारातून, तर पाट - परूळे - आंगणेवाडी आडारीमार्गे २ अशा वेंगुर्ला आगारातून जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.



# परळीसाठी अभिमानास्पद; रामरक्षा गोशाळेला महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय 'देशी गोवंश सन्मान' पुरस्कार प्रदान

■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी...

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन तसेच महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य देशी गोवंश सन्मान' योजनेंतर्गत रामरक्षा प्रतिष्ठान संचलित रामरक्षा गोशाळेला राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

परळी वैजनाथ येथे आयोजित समारंभात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. देशी गोवंश संवर्धन, गोसेवा आणि संशोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्यास पशुसंवर्धन विभाग सचिव डॉ. एन. रामास्वामी, आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीण कुमार देवरे, गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा तसेच सदस्य सुनील सूर्यवंशी, उद्धव नेरकर, सनतकुमार गुप्ता आणि नितीन मार्कंडेय उपस्थित होते. रामरक्षा गोशाळेचे संचालक रतन कोठारी यांनी मान्यवरांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार स्वीकारला.



**आदर्श गोशाळा म्हणून ओळख**

परळी वैजनाथ पंचक्रोशीत गेल्या अनेक वर्षांपासून रामरक्षा गोशाळा सेवाभाव, तळमळ आणि प्रामाणिकपणाने कार्यरत आहे. गोसेवा म्हणून सुरू करण्यात आलेली ही गोशाळा आज राज्यातील अग्रगण्य गोशाळांपैकी एक म्हणून ओळखली जाते. या ठिकाणी मोठ्या संख्येने देशी गोधनाचे संगोपन केले जाते. गोधनाच्या आरोग्याची काळजी, शाश्वत गोपालन पद्धती, जनजागृती उपक्रम तसेच विविध संशोधनात्मक प्रयोग राबविण्यात येतात. परिसरात देशी गोवंश संवर्धनाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात संस्थेची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

**परळीकरांसाठी अभिमानाची बाब**

पशुसंवर्धन विभागाने राज्यस्तरीय पातळीवर या कार्याची दखल घेत सन्मान केल्याने परळीकरांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. रामरक्षा गोशाळेला मिळालेला हा पुरस्कार परळी तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली असून, सर्व स्तरांतून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गोसंवर्धन आणि शाश्वत शेतीपूरक उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ येथे संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

उपजिल्हा रुग्णालय, परळी वैजनाथ येथे आज संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वच्छता, समाजप्रबोधन व मानवसेवेचा संदेश देणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्या कार्याची आठवण यावेळी उपस्थितांनी कृतज्ञतेने व्यक्त केली.

कार्यक्रमात श्री गजानन काळे (पोहनेर) व श्री बालाजी चाटे (परळी वै.) यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण गुट्टे, डॉ. सचिन निळे, डॉ. ज्ञानेश्वरी मुंडे, डॉ. तोष्णीवाल, डॉ. साईमा शेख, श्रीमती ज्योती जगतकर, परिसेविका श्रीमती स्वाती टाकळकर, श्रीमती रुक्मिणी गिरी, अधिपरिचारिका श्रीमती घुमरे, परिचारिका श्रीमती शेवाळे, श्रीमती शिल्पा पांचाळ, कार्यालयीन अधीक्षक श्री जुजगर साहेब, वरिष्ठ लिपिक प्रशांत कराड, कनिष्ठ लिपिक संजय वरवटकर, माणिक मुंडे, सुरज राऊत, गीताजी चव्हाण, दहिफळे साहेब, जोगदंड साहेब, सादिक शेख, नागोराव वाळले यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छता, सेवा व समाजजागृतीच्या विचारांचे स्मरण करून रुग्णालय परिसर स्वच्छ, संवेदनशील व सेवाभावी ठेवण्याचा संकल्पही करण्यात आला.



## भाजप शहर उपाध्यक्षांच्या पाठपुराव्याला यश, दिव्यांग लाभार्थ्यांना मिळाला प्रलंबित निधी

■ महागाव प्रतिनिधी

महागाव नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग लाभार्थ्यांचा प्रलंबित निधी अखेर वितरित करण्यात आला असून, भाजप शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या निधीमुळे दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नगरपंचायत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही काही पात्र लाभार्थ्यांना निधी मिळत नसल्याची बाब समोर आली होती. उपचार, शिक्षण, सहाय्यक साधने तसेच दैनंदिन उपजीविकेसाठी हा निधी अत्यंत आवश्यक असताना विलंब होत असल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर अवधूत नरवाडे व भाजप शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांनी संबंधित प्रकरण गांभीर्याने घेत प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला.

नरवाडे यांनी नगरपंचायत अधिकाऱ्यांशी चर्चा करून पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली होती. तसेच उर्वरित निधी तात्काळ वितरित करण्याची ठाम भूमिका मांडली होती. अखेर प्रशासनाने या प्रकरणाचा आढावा घेत प्रलंबित निधी वितरित करण्याचा निर्णय घेतला.

याअंतर्गत दिव्यांग लाभार्थी मंदा अंबादास वटाणे, ऋतिक अवधूत नरवाडे, शरद सुभाष कदम, दिलीप मारुती गाडी तसेच चैतन्य अमोल सुरोशे यांना निधी मिळून दिला आहे.

निधी प्राप्त झाल्याने संबंधित लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, वेळेवर मदत मिळाल्याने आमचा मोठा प्रश्न मार्गी लागला, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

या संपूर्ण प्रक्रियेत शैलेश कोपरकर व सुरेश पाटील नरवाडे यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केले. लाभार्थ्यांची कागदपत्रे पूर्ण करून देणे, प्रशासनाशी समन्वय साधणे आणि पाठपुराव्यात सक्रिय सहभाग घेणे यामुळे निधी वितरणाची प्रक्रिया गतीमान झाली, असे सांगण्यात आले.

दिव्यांगांसाठी शासनाच्या विविध योजनांतर्गत दिला जाणारा निधी हा त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. अशा निधीच्या वितरणात होणारा विलंब अनेक अडचणी निर्माण करतो.

त्यामुळे प्रशासनाने भविष्यात अशा प्रकरणांत अधिक तत्परता दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. भाजप शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांनी सांगितले की, "दिव्यांग बांधवांना त्यांचा हक्काचा निधी मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे.

पुढेही अशा प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवू. एकूणच, सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे दिव्यांग लाभार्थ्यांना प्रलंबित निधी मिळाल्याने दिलासा मिळाला असून, प्रशासनानेही सकारात्मक पाऊल उचलल्याचे दिसून येत आहे.

## महिला महाविद्यालयाची वनस्पती उद्यानास अभ्यासभेट

■ परळी बातमीदार

येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय हे विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असते . त्यांचा विकास व्हावा म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यास सहलीचे आयोजन या महाविद्यालयातील विविध विभाग करीत असतात .

त्याचाच एक भाग म्हणून महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या मार्गर्शनात वनस्पतिशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनीची दि २३ फेब्रु २०२६ रोजी परळी येथील वनस्पत्युद्यानास ( बॉटनिकल गार्डन ) अभ्यासभेट सहल आयोजित करण्यात आली . या अभ्यास सहलीत वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संगिता कचरे यांच्यासह डॉ. वर्षा मुंडे प्रा . अशिलता शिंदे यांच्यासह बीएस्सीच्या अनेक विद्यार्थीनींची उपस्थिती होत्या. या अभ्यास भेटीत तिथे असलेल्या अनेक औषधीय वनस्पतींची यथार्थ माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली . तसेच अनेक सौंदर्यवर्धक वनस्पतींचीही माहिती देण्यात आली.

दैनंदिन जीवनामध्ये आपल्या सभोवताली असणाऱ्या वनस्पतींचा मानवी जीवनात कसा उपयोग होतो, याचे सखोल मार्गदर्शन विद्यार्थिनींना करण्यात करण्यात आले . वनस्पतिशास्त्र विभागाच्या या उपक्रमाचे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी भरभरून कौतुक केले .



## लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गाडगेबाबा यांची जयंती साजरी

■ परळी वैजनाथ(प्रतिनिधी)

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादनाने करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी गाडगेबाबा यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या विचारांचे स्मरण केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कवडे यांनी आपल्या प्रास्ताविकात संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी गाडगेबाबा यांनी स्वच्छतेचा संदेश देत समाजात जनजागृती कशी केली, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कसे परिश्रम घेतले आणि शिक्षण, स्वावलंबन व समाजसेवेचे महत्त्व कसे पटवून दिले याविषयी माहिती दिली.



विद्यार्थ्यांनी गाडगेबाबा यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संत गाडगेबाबा यांच्या विचारांची आजच्या काळात विशेष गरज असल्याचे प्रतिपादन केले. स्वच्छता हीच खरी सेवा आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. समाजातील वाईट प्रथा, अंधश्रद्धा आणि अस्वच्छता दूर करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थिनींनी सामाजिक जाणीव ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवावेत, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केले होते. कार्यक्रम शेवटी उपस्थितांचे आभार मानून समारोप करण्यात आला.

## 28 फेब्रुवारी पासून शेतकरी कीर्तन महोत्सव

### किरण माने, मयांक गांधी, विलास बडे, पैगंबर शेख, स्वप्निल चौधरी अजित अभ्यंकर यांच्यासह दिग्गजांचे मार्गदर्शन

■ सिरसाळा ( प्रतिनिधी)

शेतकरी कीर्तन महोत्सव हा परळी तालुक्यातील अभिनव प्रबोधन महोत्सव म्हणून ओळखला जात असून या किर्तन महोत्सवाची महाराष्ट्रभर उत्सुकता असते. यावर्षीच्या शेतकरी कीर्तन महोत्सवात सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मयांक गांधी, ज्येष्ठ पत्रकार विलास बडे, सामाजिक कार्यकर्ते पैगंबर शेख, प्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती शेतकरी कीर्तन महोत्सवाचे संयोजक एड. अजय बुरांडे यांनी दिली.

जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या बिजोत्सवाच्या निमित्ताने 28 फेब्रुवारी ते 6 मार्च यादरम्यान यावर्षीचा शेतकरी कीर्तन महोत्सव होत आहे. जगद्गुरु तुकाराम महाराजांचा बीजोत्सव जवळ येऊ लागतो तसा परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना कीर्तन महोत्सवाची उत्सुकता लागून राहते. धारूर तालुक्यातील कान्नापूर येथे होणाऱ्या कीर्तन महोत्सवात आजूबाजूच्या 25 गावांचा सहभाग असतो. यात पारंपारिक कीर्तनाबरोबरच शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांचे आरोग्य, शेतीवर होणारे पर्यावरणाचे परिणाम, शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती आणि त्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना, यावर या शेतकरी कीर्तन महोत्सवात चर्चा होत असते.

शेतकरी कीर्तन महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे उच्च दर्जाचे वैचारिक प्रबोधन होत असतानाच या कीर्तन महोत्सवातून सर्वसामान्यांचे आर्थिक शोषण होणार नाही याची काळजी घेतली जाते. 25 गावांचा हा कीर्तन महोत्सव असला तरी अत्यंत साधेपणाने तितकेच नेटकेपणा याचे आयोजन केले जाते. भपकेबाजपणा टाळण्यासाठी दररोज एका गावातून भाकरी गोळा केल्या जातात. कीर्तन मंडपात एखादी भाजी तयार केली जाते. आपल्या घरातील एक भाकर शेतकरी कीर्तन महोत्सवाला जाते आहे या भावनेतून ही सर्व कुटुंब शेतकरी महोत्सवाशी जोडले जातात. हा नवा प्रयोग गेली चार वर्षे कान्नापूर परिसरात केला जातो. यावर्षी या कीर्तन महोत्सवात दिग्गज प्रबोधनकारांचे आणि कीर्तनकारांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

उद्घाटन सोहळ्याला सुप्रसिद्ध अभिनेते आणि समाजभान असणारे सामाजिक कार्यकर्ते किरण माने, कैकाडी महाराज मठाचे प्रमुख भारत महाराज जाधव, जागतिक कीर्तीचे मृदंग वादक उद्धव बापू आपेगावकर यांची उपस्थिती असणार आहे. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न स्वतः शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मांडणारे, प्रसंगी कमरे इतक्या पाण्यात उतरून वस्तुस्थिती जगासमोर आणणारे पत्रकार विलास बडे, विविध प्रयोगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणारे मयांक गांधी, शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नावर थेट भूमिका घेणारे पैगंबर शेख, सुप्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांची यावर्षी व्याख्याने होणार आहेत. मधुकर महाराज बारूळकर, अविनाश महाराज भारती, जनक महाराज सोळंके, गणपत महाराज पवार, एकनाथ महाराज माने , ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांची कीर्तने होणार आहेत, तर शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याचे किर्तनाने या कीर्तन महोत्सवाची सांगता होईल, अशी माहिती शेतकरी एड. अजित बुरांडे यांनी दिली.

